# निधन वार्ता

## शांताराम भुरा जावरे



**लासूर, ता.चोपडा । वार्ताहर ।** येथील रहिवासी विक्रम भुरा जावरे, दंगल भुरा जावरे, साहेबराव भुरा जावरे लासुर यांचे लहान बंधु शांताराम भुरा जावरे (मॅनेजर कतार पेंट्रोलीयम कतार सौदे अरबिया, यू.के.) यांचे दि.२३ जून रोजी सकाळी निधन झाले असून त्यांची अंत्ययात्रा बुधवार, दि.२५/६/२०२५ रोजी संध्याकाळी ६ वाजता धुळे येथील भोई सोसायटी, देवपुर, धुळे येथून निघणार आहे

## फुलसिंग अमृत पाटील



**भुसावळ । प्रतिनिधी ।** तालुक्यातील खंडाळा येथील रहिवासी फुलसिंग अमृत पाटील (वय ७५) यांचे दि.२३ रोजी सकाळी ९.३० वाजता निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, भाऊ, बहीण, नातवंडे असा परिवार आहे. ते सुकदेव पाटील, शांताराम पाटील यांचे भाऊ तर मनोहर पाटील व नरेंद्र (अण्णा) पाटील यांचे वडिल होत.

## गंगुबाई रघुनाथ चौधरी



**भुसावळ । प्रतिनिधी ।** येथील तापी नगरातील रहिवासी गंगुबाई रघुनाथ चौधरी (वय ८७) यांचे वृद्धापकाळाने दि.२१ रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, सून, मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्या सचिन चौधरी यांच्या आई होत्या.

# पती, सासूच्या छळाला कंटाळून विवाहितेची आत्महत्या

**चाळीसगाव । प्रतिनिधी ।** तालुक्यातील राजदेहने येथे वर्षभरापूर्वीच विवाह झालेल्या २० वर्षीय विवाहीतेने पती व सासूच्या छळाला कंटाळून गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी मृत विवाहितेच्या भावाने दिलेल्या फिर्यादीवरून पती व सासूच्या विरोधात चाळीसगाव ग्रामीण पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

धुळे येथील माहेर असलेल्या भारती सुनील बड़े (वय २०) हिचा विवाह चाळीसगाव तालुक्यातील राजदेहरे येथील सुनील बबन बड़े याच्याशी १८ जुलै २०२४ रोजी झाला. लग्नानंतर काही कारणावरून भारती हिस पती व सासूने किरकोळ कारणावरून मारहाण केली. अधून-मधून मारहाणीसह शिवीगाळ पतीकडून सुरू होता. नातेवाईकांनी पती व पत्नी यांच्यात समजूत काढून संसार सुखाचा करण्याचा प्रयत्न केला. परंतु वेळोवेळी सासरी तसेच उसतोडणीच्या कामासाठी गेलेल्या कंपनीच्या ठिकाणी भारती हिचा पती सुनील बडे व सासू निलाबाई बबन बड़े (दोन्ही रा.राजदेहरे, ता.चाळीसगाव, जि.जळगाव) यांनी भारती हिस मारहाण व शिवीगाळ करून शारीरिक व मानसिक त्रास देवून आत्महत्येस प्रवृत्त केल्याने भारती हिने रविवार २२ जून रोजी दुपारी १२.४० वाजेच्या सुमारास राहत्या घरी राजदेहरे येथे गळफास घेऊन आत्महत्या केली.

याप्रकरणी मयत भारती बड़े हिचा भाऊ दीपक जयराम भील (रा.आर्णी, ता.जि.धुळे) याने दिलेल्या फिर्यादीवरून पती सुनील बबन बड़े व सासू नीलाबाई बबन बडे यांच्याविरोधात चाळीसगाव ग्रामीण पोलीस स्टेशनला भारतीय न्यायसंहिता कलम १०८,११५ (२), ३५२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस या घटनेचा तपास करीत आहेत.


## जाहिर नोटीस

तमाम लोकांना या नोटीसी द्वारे जाहीर सूचना देण्यात येते की-

आमचे अशिल सुरेंद्र संतोष बठेजा व अतुल रामदास बठेजा रा. सिंधी कॉलोनी, जामनेर रोड, भुसावळ जि.जळगांव यांचे तर्फे ॲड. निलेश एस. मोघे भुसावळ यांचे कडुन जाहीर नोटीस देण्यात येते की-

1. तु.जि.जळगांव पो. तु. ता. भुसावळ पैकी मौजे भुसावळ येथील नगरपालिका भुसावळ हद्दीतील टी.पी. स्किम नं.1 फायनल प्लॉट नं.15 अंतर्गत स.नं. 195/1 मधील प्लॉट नं.5 क्षेत्र 473.00 चौ.मी. चा संपूर्ण प्लॉट असा आहे. सदर प्लॉटची चतु:सिमा पूर्वेस -9.00 मी. रुंदीचा रोड व नॅशनल हायवे नं.6, पश्चिमेस- प्लॉट नं.4, उत्तरेस-9.00 मी. रुंदीचा रोड व नॅशनल हायवे नं. 6, दक्षिणेस -9 मी. रुंदीचा रोड वरील मिळकतीचा पक्का सौदा आमचे अशिल यांनी मिळकत मालक 1. मनोज सुदाम नेमाडे, 2.श्रीमती सविता योगेश नेमाडे, 3. भावेश योगेश नेमाडे सर्व रा. जुना वांजोळा रोड, वाणी कॉलोनी समोर, भुसावळ यांचेशी केलेला आहे. आज रोजी वरील मिळकत रजिष्टर खरेदी खत करुन घेण्या करीता पक्का सौदा केलेला आहे. सदर मिळकत ही आज रोजी बोजे विरहीत दिसत आहे सदर मिळकतीचे मालकांनी वरील मिळकतीवर कोणताही बोजा व गहाण कोठेही ठेवलेली नाही असे आश्वासन आमच्या अशिलाला दिलेला आहे.

2.आमचे अशिल या जाहीर नोटीसी द्वारे तमाम लोकांना सुचित करु इच्छीतात की, वरील प्लॉट मिळकत बाबत कोणाचाही काही कायदेशीर हक्क या मिळकतीवर हरकत, बोजा गहाणखत, कब्जा, बक्षीसपत्र, लिज पेन्डस, तक्रारी, किंवा या पुर्विचे व्यवहार असल्यास काही हीतसंबंध अगर हक्क असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून 15 दिवसांचे आत आमचे अशिल किंवा वकिलांकडे संबंधित हरकतींचे कागदपत्रांचे पुराव्यासह व किंवा शासकीय दस्तांसह तक्रार नोंदवावी. ही तक्रार या नोटीसीचे प्रकाशनाच्या तारखेपासून 15 दिवसांचे आत नोंदवण्यात यावी. नाही तर आमचे अशिल वरील प्लॉट मिळकतीची मुदत संपल्यानंतर खरेदीखत प्लॉट मिळकतीचे मालक यांचे कडून करुन नोंदुन घेणार आहेत व त्यानंतर कोणाचीही काही एक तक्रार/हरकत लक्षात घेतली जाणार नाही. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कळावे नोटीस देणाराची सही

दि.20.06.25

नोटीस देणाराचे वकील
ॲड. निलेश एस. मोघे
नसरवानजी फाईल, शिवाजी नगर,
भुसावळ जि.जळगांव मो. 9823098239




# ‘करे योग, रहे निरोग’ ब्रीद प्रत्येकाने अंगीकारावे-कॅप्टन डॉ.राजेंद्र राजपूत

■ **फैजपूर, ता.यावल । प्रतिनिधी**

सध्याच्या धकाधकीच्या जीवनमानात अती नकारात्मकता, ताणतणाव, नैराश्य, उदासीनता, दुःखाला समर्थपणे सामोरे न जाण्याची वृत्ती, जीवघेणी स्पर्धा व सध्यस्थितीत विश्वातील युद्धजन्य परिस्थितीमुळे मानवी जीवन नकारात्मकतेकडे आणि अनारोग्याकडे झुकत चालले आहे. यातून योग, प्राणायाम, ध्यानधारणा या भारतीय ऋषीमुनींच्या शोधातून आपले जीवन निरोगी, आनंदी उत्साही आणि यशस्वी होण्यास मदत होईल. यासाठी ‘करे योग, रहे निरोग’ हे ब्रीद प्रत्येकाने अंगी करावे, असे आवाहन कॅप्टन डॉ. राजेंद्र राजपूत यांनी केले.

ते आंतरराष्ट्रीय योग दिवसाच्या औचित्याने आयोजित योग प्रशिक्षण शिबिरात ते बोलत होते. धनाजी नाना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र वाघुळदे व १८ महाराष्ट्र बटालियन एनसीसी जळगावचे समादेशक अधिकारी कर्नल अश्विन वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाच्या राष्ट्रीय छात्र सेनेचे अधिकारी कॅप्टन डॉ.राजेंद्र राजपूत यांनी स्वतः सह कॅडेट्सकडून योगासने करून घेतलीत. यात ३८ कॅडेटसनी सहभाग घेतला. तत्पूर्वी योगासनांचा जीवनात उपयोग केल्यास आयुष्यात उच्चतम यशप्राप्ती सहज शक्य असल्याचे प्रतिपादन कॅप्टन डॉ.राजेंद्र राजपूत यांनी केले. यावेळी उपस्थित कॅडेट्सनी योगासने केलीत. योग प्रशिक्षण शिबिराच्या यशस्वीतेसाठी धनाजी नाना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र वाघुळदे, उपप्राचार्य प्रा.डॉ. मनोहर सुरवाडे, उपप्राचार्य प्रा. डॉ.कल्पना पाटील, उपप्राचार्य प्रा.डॉ.हरीश नेमाडे, कॅप्टन डॉ. राजेंद्र राजपूत प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी, कॅडेट्स यांनी मार्गदर्शन व परिश्रम घेतले.

# अमळनेर येथे रा.काँ.(श.प.), सेना (उबाठा)तर्फे तहसील व प्रांत कार्यालयावर मोर्चा

■ **अमळनेर । प्रतिनिधी**



नोव्हेंबर २०२४ मध्ये पार पडलेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची न्यायालयीन चौकशी करण्यात यावी या मागणीसाठी जिल्हा कॉंग्रेसतर्फे अमळनेर तहसील कार्यालय व प्रांत कचेरीवर मशाल मोर्चा काढण्यात आला. राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार गट) व शिवसेना (उबाठा) कार्यकर्तेदेखील मोर्चात समाविष्ट झाले होते.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु व राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांना नायब तहसीलदार प्रशांत धमके व शिरस्तेदार जोशी यांच्यामार्फत निवेदन देण्यात आले. कॉंग्रेसने विधानसभा निवडणुकीतील घोटाळ्याचे पुरावे निवडणूक आयोगाला दिले. मतदानाचे सीसीटीव्ही फुटेज मागितले ते आयोगाने दिले नाहीत. २०१९ ते २०२४ पर्यंत पाच वर्षात ३१ लाख मतदार होते. अवघ्या पाच महिन्यात तब्बल ४१ लाख मतदान महाराष्ट्रात वाढले हे आश्चर्यकारक आहे. २०२४ च्या निवडणुकीत मतदानाची प्राथमिक टक्केवारी ५८.२२ टक्के असताना अंतिम टक्केवारी ६६.५ टक्के जाहीर करण्यात आली. अचानक आठ टक्के मतदान कसे वाढले. खासदार राहुल गांधी यांनी संसदेत हा मुद्दा उपस्थित केला मात्र निवडणूक आयोग तर्कसंगत उत्तर देऊ शकले नाही. हा प्रकार लोकशाही व्यवस्थेसाठी अत्यंत घातक आहे म्हणून या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करण्यात यावी अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहापासून छत्रपतींच्या पुतळ्याला माल्यार्पण करून २३ रोजी सायंकाळी साडे सहा वाजता मशाल मोर्चा तहसील कार्यालयावर निघाला. तहसील कार्यालयावर मोर्चा येताच सभेत रूपांतर झाले. यावेळी युती सरकार विरोधात घोषणाबाजी करण्यात आली. मोर्चाचे नेतृत्व मा.आ.शिरीष चौधरी,मा.आ.डॉ.बी.एस.पाटील, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष सुलोचना वाघ, जिल्हाध्यक्ष प्रदीप पवार, मुफ्ती हारून नक्की, माजी जिल्हाध्यक्ष ॲड.संदीप पाटील, तुषार संदानशीव, धनंजय चौधरी यांनी केले होते. मोर्चात आशुतोष पवार, डॉ.राजेंद्र पाटील, अमळनेर तालुकाध्यक्ष बी.के.सूर्यवंशी, शहराध्यक्ष मनोज पाटील, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष डी.एम. पाटील, शहराध्यक्ष प्रशांत निकम, प्रा.अशोक पवार, संदीप घोरपडे, महेश पाटील, डॉ.रवींद्र पाटील, प्रा.श्याम पवार, शिवसेनेचे चंद्रशेखर भावसार, मोहन भोई, विजय पाटील, देवेंद्र देशमुख, रतीलाल माळी, दिलीप शेंडे, सखाराम मोरे, शैलेश बोदर्डे, मनोज चौधरी, रामचंद्र माळी, मोहन पाटील, गणेश सोनवणे, संजय पाटील, विवेकानंद पाटील, चिंधू वानखेडे, राजल सवर्णे यांच्यासह जिल्ह्यातील रावेर, चोपडा, जामनेर, एरंडोल, भडगाव, पारोळा, मारवड, धरणगाव, यावल आदी ठिकाणचे कॉंग्रेसचे कार्यकर्ते हजर होते.

# शरीर सुदृढतेसाठी योगाभ्यास करावा-महामंडलेश्वर जनार्दनहरिजी महाराज

■ **फैजपूर, ता.यावल । प्रतिनिधी**




माणसाच्या जीवनात शारीरिक संपत्ती सर्वोत्कृष्ट असल्याने आपल्या शारीरिक तंदुरुस्तीसाठी दररोज किमान अर्धा तास योगाभ्यास करावा, असे अखिल भारतीय संत समितीचे कोषाध्यक्ष महामंडलेश्वर जनार्दन हरीजी महाराज यांनी जागतिक योग दिनानिमित्त घेतलेल्या भव्य दिव्य कार्यक्रमात सांगितले.

प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याची जोपासना करावी, पृथ्वीला वाचवण्यासाठी प्रदूषण मुक्त व्यवहार करावे, आपल्या घरात किंवा बाहेर योग्य त्या ठिकाणीच कचरा टाकावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. निसर्गरम्य अशा सुंदर वातावरणात असलेले तुलसी हेल्थ केअर सेंटर श्री निष्कलंक धाम वढोदा येथे दि.२१ जून रोजी सकाळी ७.३० वाजता शेकडो विद्यार्थी व नागरिकांच्या उपस्थितीत योग प्राणायाम विधी करण्यात आल्या. आचार्य सचिन पाटील यांनी योगाच्या वेगवेगळ्या क्रिया, त्याची सविस्तर माहिती, शरीरासाठी त्याची उपयुक्तता व निरोगी जीवनासाठी योगाचा उपयोग यासंदर्भात माहिती दिली.

पान १ वरुन ...

## धोरणाला कृतीची साथ आवश्यक

केला आहे. त्यामुळे अनेक कामे सोपी होऊ शकतील, अशी अपेक्षा ते व्यक्त करतात. विविध पातळ्यांवर असे प्रयोग होणे हा महत्त्वाचा टप्पा आहे. प्रयोग झाले तर अभ्यास होईल. त्याचे निष्कर्ष लक्षात येतील. चुकांचा मागोवा घेतला जाऊ शकेल. तंत्रज्ञानाच्या अचूक वापरासाठी ही प्रक्रिया आवश्यकच असते. त्याचे फायदे अनुभवास यायला लागले की सेंद्रिय शेती, पशुधन, शेतीपूरक उद्योगात वापराची प्रेरणा मिळू शकेल. शेती व्यवस्थापनावरचा ताण कमी होऊ शकेल. अर्थात त्यासाठीची मानसिकता बदल, कौशल्य विकास आणि तंत्रज्ञानाची गरजेपुरती का होईना पण तोंडओळख करुन घेणे ही शेतकऱ्यांची पण जबाबदारी आहे.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार टप्प्यात

समिती, आदींच्या निवडणुका कधी कोरोनाच्या संसर्गाचे कारण देत, तर कधी ओबीसी आरक्षणाचा मुद्दा समोर आणून घेतल्या गेल्या नाहीत. ओबीसी आरक्षण द्यायचे की नाही यावरसुद्धा बराच गदारोळ झाला. कोरोनाचा संसर्ग कमी झाल्यानंतर २०२० पासून राज्यात कुठे एकदा तर कुठे दोनदा, तीनदा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची तयारी करण्यात आली होती. पण, या निवडणुका घेण्यात आलेल्या नाहीत. कोर्टानेही निवडणुका घेण्याचे दिले होते निर्देश दरम्यान, जिल्हा परिषद, महानगरपालिकेसारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत सुप्रीम कोर्टाने ६ मे रोजी निर्णय दिला. ओबीसींना २०२२ पूर्वी असलेले आरक्षण कायम ठेवून सुप्रीम कोर्टाने राज्य निवडणूक आयोगाला चार महिन्यांच्या आत निवडणुका घेण्याचे निर्देश दिले. चार आठवड्यांच्या आता निवडणुकांसदर्भातील अधिसूचना काढण्यासही सुप्रीम कोर्टाने सांगितले होते. २०२२ मध्ये बांठिया आयोगाचा अहवाल सादर होण्यापूर्वी अस्तित्वात असलेल्या ओबीसी आरक्षणाला महाराष्ट्र राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे निर्देश सुप्रीम कोर्टाने दिले आहेत. काही स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ५ वर्षांपर्यंत निवडणुका झाल्या नसल्याचे कोर्टाने नमूद केले. त्यामुळे सुप्रीम कोर्टाने राज्य निवडणूक आयोगाला ४ आठवड्यांच्या आत निवडणुकीची अधिसूचना काढण्याचे निर्देश दिले आहेत.

## मुख्यमंत्र्यांनी रोखल्या बदल्या!

संख्या लक्षणीय आहे. राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला पुढील आठवड्यात सुरुवात होत आहे. तत्पूर्वी बदल्यांची फाईल मंजूर व्हावी, यासाठी मंत्री कार्यालयातून प्रयत्न सुरु आहेत. सार्वजनिक बांधकाम खात्यातील १३१ अभियंत्यांच्या बदलीचे आदेश मे महिन्यात काढण्यात आले. उर्वरित बदल्या जूनमध्ये अपेक्षित होत्या. मात्र, अद्याप तरी अतिरिक्त मुख्य सचिव मनीषा म्हैसकर यांनी बदल्यांची फाईल हातावेगळी केलेली नाही. प्रशासकीय आणि विनंती बदल्या रखडल्याने अभियंत्यांची घालमेल वाढली आहे. ग्रामविकास आणि पाणी पुरवठा खात्यातही हीच स्थिती आहे.

## अंदाज समितीच्या बैठकीला अजितदादांची दांडी!

होते. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला आणि राज्यसभेचे उपसभापती हरिवंश सिंह यांची उपस्थिती असल्याने संपूर्ण राजशिष्टाचार पाळण्यात आला होता. मात्र, या परिषदेच्या उदघाटन सोहळ्याला अजित पवार यांची अनुपस्थिती सर्वांच्या चर्चेचा विषय बनली होती. वित्त खाते आणि सरकारी खर्चाची काटकसर या मुद्द्यावर परिषदेत माहितीचे आदान - प्रदान होते. अशावेळी अजित पवार यांची उपस्थिती आवश्यक होती. मात्र संध्याकाळी अजित पवार मंत्रालयातील आपल्या दालनात होते हजर होते, असे सांगण्यात आले.

### चांदीचे ताट आणि राजेशाही थाट

या परिषदेला नवी दिल्लीतून राष्ट्रीय पातळीवरील २० ते २५ पत्रकारांची टिम मुंबईत आली आहे. या पत्रकारांची राहाण्याची व्यवस्था ट्रायडंट या पंचतारांकित हॉटेलमध्ये करण्यात आली आहे. या परिषदेला उपस्थित राहाण्यासाठी आलेल्या वअति महत्वाच्या व्यक्तींसाठी विधानभवनाच्या हिरवळीवर विशाल महाकाय मंडप उभारण्यात आला आहे. त्यांच्यासाठी चांदीच्या ताटात राजेशाही जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती. अंदाज समितीच्या बैठकीत वित्तीय खर्चावर नियंत्रणात आणण्याबाबत चर्चा केली जाते. मात्र, या राष्ट्रीय परिषदेत भोजनावळीवर काही लाख रुपयांचा खर्च करण्यात आल्याची चर्चा आहे. नवी दिल्लीतून आलेल्या अति महत्वाच्या व्यक्तींच्या कुटुंबियांना मुंबई दर्शन घडवण्यात आले. त्यात प्रभादेवीचे सिद्धिविनायक मंदिर आणि इस्कॉन मंदिरातही नेण्यात आल्याचे सांगण्यात येते.

### अंदाज समितीच्या काही प्रमुख जबाबदारी

अशासकीय अंदाजपत्रकीय धोरणासंबंधी सुधारणा सुचवणे, खर्चात काटकसर करता येईल का हे तपासणे आणि तशा शिफारशी करणे. मंजूर केलेल्या निधीचे योग्य प्रकारे वाटप झाले आहे का ते तपासणे.


## महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

महानिर्मिती

१ X ६६० मे.वॅ. प्रकल्प, भुसावळ

ई-निविदा सूचना

| ई-निविदा तपशील क्र. | कामाचे नांव | अंदाजित खर्च (रू.) | बयाणा रक्कम (रू.) |
|---|---|---|---|
| ३०००५७५३४ | १×६६० मे. वॅट भुसावळ प्रकल्प कार्यालयात स्प्लिट एअर कंडीशनरचे ब्रेकडाऊन मेंटेनन्स, प्रिवेंटिव्ह मेंटेनन्स, सर्व्हिसिंग, रिपेयरिंग इ. देखभाल करण्याच्या कामाचा करार. | २,६०,४८०/- | ६,११०/- |

निविदा शुल्क : रू. ११८०/-

संपर्क: मुख्य अभियंता (प्रकल्प) यांचे कार्यालय, म.रा.वी.नि.कं. मर्यादित, १ x ६६० मे. वॅट प्रकल्प कार्यालय, दीपनगर भुसावळ. पिन - ४२५३०७.
दूरध्वनी ०२५८२ - २५०३७९. ई-मेल - cebslproj660@mahagenco.in
निविदा वितरणाचा / विक्रीचा कालावधी, निविदा भरण्याचा कालावधी इतर आणि अधिक माहितीसाठी http://eprocurement.mahagenco.in या संकेत स्थळावर भेट देणे.

मुख्य अभियंता (प्रकल्प)
१ x ६६० मे. वॅट भुसावळ प्रकल्प


## नशिबाची परीक्षा

मंगळवार २४/०६/२०२५

*** मिलन डे ***

२४६ / ४८० / ३३६ — २-९ — १२६ / २७० / २२५ | सिंगल २-३-०

जोड २१-८९-३४-९५-०४

*** कल्याण बाजार ***

१२८ / २९० / २२७ — १-० — १९० / २८० / ५५० | सिंगल १-४-७

जोड १३-८०-४५-७९-०६

*** मुंबई (मेन) बाजार ***

२३५ / ३७० / ३३४ — ०-२ — १५६ / २४६ / २२८ | सिंगल ०-१-५

जोड ०६-३२-१८-५९-२४

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारीत आहे. कोणीही दुरुपयोग करु नये मो.९९७५४७९८२६

**रविवार २२/०६/२०२५**
मेन बाजार -
मिलन ना. -

**सोमवार २३/०६/२०२५**
मेन बाजार -
कल्याण - १५९-५३-२४७
मिलन डे - ३५०-८३-३५५
मिलन ना. -

## कल्याण

| दि. | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| २८-०४-२०२५ ०३-०५-२०२५ | १३५-९८-११६ | ४७९-०४-११२ | १३६-०३-१४८ | १२३-६२-१३८ | १५८-४७-२६९ | २५७-४५-२५८ |
| १२-०५-२०२५ १७-०५-२०२५ | २३३-८२-३३६ | ५६९-००-३८९ | २७८-७४-५९० | २८८-८३-१५७ | ३८९-०८-४६८ | ६९०-५७-१६० |
| १९-०५-२०२५ २४-०५-२०२५ | ६९०-५७-१६० | १९०-००-१४५ | १६७-४७-३४० | २३७-२१-१३७ | १७९-७२-१२९ | ३९०-२६-३६७ |
| २६-०५-२०२५ ३१-०५-२०२५ | १४८-३०-१४५ | २५९-६१-१२८ | ४७०-१६-४५७ | १२५-८१-६७८ | ७९०-६५-६९० | ● |
| ०१-०६-२०२५ ०७-०६-२०२५ | २२९-३४-४५५ | ८९९-६२-१३८ | ७७८-२१-४७० | २४४-०२-३३६ | २५५-२३-२४७ | ११०-२४-२४८ |
| ०९-०६-२०२५ १४-०६-२०२५ | ५७९-११-३३५ | ९९०-८९-५६८ | ३५६-४०-५७८ | १६०-७६-७९० | १५८-४४-१६७ | १३३-७५-१५९ |
| १६-०६-२०२५ २१-०६-२०२५ | ५७८-०७-११५ | २२०-४२-१३८ | ४४६-४८-१२५ | १४८-३३-५९९ | २७८-७२-३९० | ६८९-३४-७७० |
| २३-०६-२०२५ २८-०६-२०२५ | १५९-५३-२४७ | | | | | |

## मिलन डे

| दि. | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| २८-०४-२०२५ ०३-०५-२०२५ | १३५-९९-३७९ | ४४९-७८-३५० | ३३६-२६-८८० | २४८-४८-२७९ | १६६-३०-४७९ | ५९०-४८-१८९ |
| १२-०५-२०२५ १७-०५-२०२५ | १३५-९६-२६८ | २८८-८९-३६० | ८९०-७३-५८० | १२०-३१-६६९ | ६६८-०८-१३४ | २५६-३४-२३९ |
| १९-०५-२०२५ २४-०५-२०२५ | २५६-३४-२३९ | ३८०-१२-३४५ | २७८-७०-१३६ | २६९-७०-३८९ | १२३-६०-१४५ | १६९-६७-२५० |
| २६-०५-२०२५ ३१-०५-२०२५ | ४७९-१७-३६८ | ५००-५४-२४८ | ५७०-२८-३६९ | ३४७-४०-१४५ | ६७७-०३-३४६ | ५७०-२८-४५९ |
| ०१-०६-२०२५ ०७-०६-२०२५ | ५७९-१५-२५८ | ४६८-८२-३४५ | २४८-४३-१६६ | ६९०-५९-२८९ | ४६८-८६-३४९ | ११४-६३-२५६ |
| ०९-०६-२०२५ १४-०६-२०२५ | २४५-१४-७७० | ४५०-९७-५५७ | ५६०-१२-११० | १९०-०४-१४९ | २३९-४४-२३९ | २४०-६४-२६६ |
| १६-०६-२०२५ २१-०६-२०२५ | ४८९-१२-५७० | २४६-२१-३४४ | १३७-१५-२५८ | ८००-८७-१६० | ४५७-६७-४५८ | ५९९-३५-११३ |
| २३-०६-२०२५ २८-०६-२०२५ | ३५०-८३-३५५ | | | | | |

## मिलन नाईट

| सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|
| २५९-६४-२६६ | ३४८-५७-३४० | ३५७-५९-३७९ | २५८-५६-१७८ | २७९-८६-८८० | १६७-४४-१४९ |
| १६७-४४-१४९ | ४६७-७९-२७० | २३५-०६-६०० | १७९-७४-२३९ | १७०-८२-३९० | ५८०-३२-२३७ |
| ५८९-२९-१९९ | ७८०-५६-१२३ | २६७-५०-१४५ | १२६-९५-१५९ | ११६-८१-१५५ | ७००-७७-४६७ |
| १२८-१८-४७७ | १४६-१७-८९० | ४६०-०३-५९९ | १६७-४१-३९९ | ५५८-८७-२५० | ३९९-१३-२५६ |
| २२४-८१-४७० | ६७७-०६-३५८ | १२३-६९-९०० | ३६९-८६-२६८ | १५०-६४-२२० | ३६८-७१-४७० |
| १६९-६०-४७९ | ४९०-३७-३७० | २३५-०५-७८० | २३५-०३-६८९ | १७७-५५-२५८ | ३८९-०२-५८९ |
| ४९९-२२-६८८ | २९०-१३-३५५ | ५७०-२९-३६० | २८०-०१-५६० | १७७-५९-३७९ | ४४७-५६-३६७ |
| | | | | | |


## देशदूत ‘CLASSIFIED’ छोटी जाहिरात तुमची, समाधान आमचे प्राधान्य!

**सूचना** वृत्तपत्रातुन प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी जाहीरात संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची 'देशदूत'वृत्तपत्र समुह कोणतीही हमी घेत नाही,जाहीरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता न झाल्यास त्याच्या परीणामाबद्दल 'देशदूत' वृत्तपत्र समुहाचे मुद्रक, प्रकाशक,संपादक वमालक तसेच जाहीरात एजनसीचे मालक जवाबदार राहणार नाही याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी

### पाहिजेत

हेअर कटींग सलुन दुकान कामासाठी ट्रेन/अनट्रेन कारागीर पगारी व कमिशन बेसीसवर पाहीजेत. न्हावी समाजाच्या गरिब व होतकरु मुलांना न्हावी या व्यवसायाचे प्रशिक्षण बेसीक पासुन ते प्रोफेशनल सलुन डिप्लोमापर्यन्त मोफत दिले जाईल. तसेच जळगाव व्यतिरिक्त बाहेर गावाच्या मुलांना राहण्याची व जेवनाची व्यवस्था मोफत आहे. फॅमिलीसह राहणाऱ्यांसाठी रुम उपलब्ध आहेत. संपर्क : ९४२३१८५१५६, ९५७९०७४२९९ (सीएम- ३९६२६० दि.३०/६/२५)

### फेंगशुई

सुख समृध्दीसाठी बिना तोड-फोड वास्तुदोष निवारण पारंपरीक वास्तु शास्त्र प्राचीन फेंगशुई द्वारे सर्व समाधन,फेंगशुई तज्ञ सुर्यवंशी **9881462286,** (VM 23/05/26)

### वॉटर प्रुफिंग

KM वॉटर प्रुफिंग 44 वर्षांपासून कामाचा अनुभव टेरेस, बाथरुम, संडास, बेसमेंट, पाण्याच्या टाकीची लिकेज 5 ते 10 वर्षांच्या 100% गॅरंटीने विनातोडफोड करुन मिळेल. संजय कुमावत-9822275444, संतोष कुमावत-7038818444 (18/7/25)

### १००% व्यसनमुक्ती

*गॅरंटीने सोडवा.दारु + गुटखा + सिगरेट + बीडी + मावा+ तंबाखु + बार + खैनी + भांग + गांजा + अफिम + जर्दा+ ताडी + स्नेकबाईट + व्हाईटनर व्हाइटपावडर + हिरॉईन + चरस + कोकेन+MD + L.S.D Dot पेपर +झोपेची गोळी + इंजेक्शन, संपर्क :9552619752.,www.drpalvenashamuktikendra.in डॉक्टरपालवे,नशामुक्ती केंद्र,वरणगांव. (VM.10/01/26.CRINIV-2425JL/CRG00504)

### उपचार सर्वांसाठी सर्व आजारांसाठी

जुनाट सर्दी,जुनाट गुडघेदुखी,चालता, बसता,उठता न येणे.जुनाट संधीवात/ चिकून गुनिया,जुनाट ॲलर्जी,जुनाट अर्धशिशी,जुनाट मुळव्याध,एचआयव्ही ,भुक लागत नाही?वजन कमी ? थकवा जाणवतो?LOW CD4 COUNT? उपचार सर्वांसाठी सर्व आजारांसाठी,भेटा-अहमदनगरचे सुप्रसिध्द डॉक्टर पालवे,वरणगांव संपर्क:9552619752(VM.10/01/26. CRINIV-2425JL/CRG00505)

### ऐकण्याची समस्या ?

अदृष्य डिजीटल कर्णयंत्र,वापरा सर्व कंपनीचे डिजीटल रिचार्जेबल कर्ण यंत्रावरती भरपुर सुट तसेच अडखत बोलणे,बोबडे बोलणे याच्यावर **स्पिच थेरपी**,तर आजच कानाची तपासणी करा संपर्क श्री साईकृपा स्पिच ॲण्ड हिअरिंग केअर,पांडुरंग टॉकीज मागे,दगडी पुला जवळ, भुसावळ,मो.9420899102, 9320899102.(VM 30/06/25)

### दारु बंदीचा गुरुमंत्र

द ग्रेट साईटिस्ट...(Best Doctor & GOLD MEDAL AWARDED) व्हॉटसअॅप डॉ.पालवे, ॲडमिट करा...।। नका करु...,पेशंटला सांगा....।। नका सांगु... पेशंटला आणा....।। नका आणु.... * व्यसन पेशंटचे... विश्वास तुमचा...उपचार आमचे... Lifelong व्यसनापासुन १०० टक्के मुक्ती....सर्व सुविधांना परीपुर्ण :- *व्यसनमुक्ती Special पॅक,मेडिसीन,इंजक्शन स्प्रे,ड्रॉप,ऑपरेशन,गोळी टाकणे, मंत्रोपच्चार...ॲडमिट सुविधा... *(विशेष)गरीबांसाठी फी मध्ये सवलत... तर आजच संपर्क: 9552619752.डॉक्टर पालवे, नशामुक्ती केंद्र,वरणगांव.(VM.10/01/26.CRINIV-2425JL/CRG00504)

### शिलाई मशीन रु.5550 पासून

अरुण, उषा, रिमा, शिल्पा, विराट व इतर कंपनीचे शिलाई मशिन, सर्वप्रकारचे ओरिजनल स्पेअर्स व मशीन दुरुस्तीसाठी आर.के. शिलाई मशिन, दु.न.११, श्री गणपती, प्लाझा, स्टेट बँकशेजारी, चित्रा चौक, जळगाव, मोबाईल.9890874057, 9146074374 (VM30/06/25)